पुण्य नगरी

# जिल्ह्यास ५० ऑक्सिजन कॉन्सेन्ट्रेटर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स पाईप्स यांच्या वतीने जिल्हा प्रशासनाला ५० ऑक्सिजन कॉन्सेन्ट्रेटर प्रदान करण्यात आले. पालकमंत्री सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालय येथे हा कार्यक्रम झाला.

कोरोनाची दुसरी लाट आटोक्यात आणण्यासाठी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. सध्या सर्वत्र व्हेंटिलिटर आणि ऑक्सिजनची आवश्यकता भासत आहे. ही गरज ओळखून हा उपक्रम राबवण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हे कॉन्सेन्ट्रेटर जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, भूजल सर्वेक्षण पुणे विभागाचे प्रमुख मल्लिनाथ कलशेट्टी, निवासी उपजिल्हाधिकारी भाऊसो गलांडे, तसेच विनय नलावडे, अतुल गबाळे, वैभव कुलकर्णी, प्रवीण क्षीरसागर, जयंतीभाई पटेल, माजी उपमहापौर संजय मोहिते यांच्यासह मुकुल माधव फौऊंडेशनचे पदाधिकारी आणि फिनोलेक्सचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.